मुद्रि ५ प्रत १४ — १४१४

# हिशोब

तू अपेक्षिले मजकडून जें जें काही,
मी त्याच्यासाठी कधीच जगलो नाहीं ॥ध्रु.॥

किती निवांत आणि नितांत केली पूजा
लोचनात जपली हृदये तुझ्या नि माझ्या
कां मोल शोधिते, त्यांचे ठाओ ठाओ ?
मी त्याच्यासाठी कधीच जगलो नाहीं .... १

कधी पूर ओसरून उर किनारा केला
वादळात जपला स्मृति-स्वप्नांचा झेला
कां स्वत्व शोधिते दिशादिशातून दाही ?
मी त्याच्यासाठी कधीच जगलो नाहीं ... २

मी अनाम जगलो जीवन उन्मेषाने
अंधारी लिहिले चंद्रबळाचे गाणे
हे दिले घेतले हिशोब काही नाहीं !
मी त्याच्यासाठी कधीच जगलो नाहीं .... ३

१४.१०.८२

[signature]